UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

## पुरवणी अंक १ – डिसेंबर २०२२

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणी अंक : १

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्राचार्य डॉ.विश्वास शा.कंधारे ● डॉ.तबस्सुम मु.इनामदार ● प्रा.अफरोज अ.सय्यद

**❊ प्रकाशक ❊**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-
वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१ **अण्णाभाऊ साठे : एक मार्क्सवादी तत्वज्ञ**
- डॉ. आर. डी. आचार्य , परळी वैजनाथ ---------------------------- ४

२ **अण्णाभाऊ साठे : मानवतावादी साहित्यिक**
- डॉ. मुक्ता निवृत्ती बिरादार, हदगाव, जि.नांदेड. ---------------------------- ८

३ **अण्णा भाऊ साठे : जीवन, साहित्य आणि विचार**
- डॉ.प्रा.डॉ.पंजाब शेरे, किनवट, जि.नांदेड ---------------------------- ११

४ **अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरीतील समाज प्रबोधन**
- डॉ.रमेश शेवाळे, मुक्ताईनगर, जि.जळगाव ---------------------------- १४

५ **अण्णाभाऊंची 'माझी मैना' या छक्कडमधील सामजिकता**
- डॉ. शिवाजी गायकवाड, उस्मानाबाद. ---------------------------- १८

६ **अण्णाभाऊ साठे : मानवतावादी साहित्यिक**
- डॉ.सहदेव रसाळ, उस्मानाबाद. ---------------------------- २३

७ **अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे मानवतावादी स्वरूप**
- प्रा. मारोती गोविंदराव गायकवाड, लातूर. ---------------------------- २८

८ **Feministic Concern in Anna Bau Sathe's Waijayanta, Alguj and Ratna**
**- Dr. Ambadas Dadasaheb Sakat, Wai, Dist.Satara** ---------------------------- ३२

९ **Anna Bhau Sathe's Literature: Voice against Silencing Culture**
**- Dr. Ahilya B. Barure, Ambajogai, Dist.Beed** ---------------------------- ३६

१० **Ambedkarite and marxist ideology reflected in Anna bhau Sathe's literary writing**
**- Raghu Shivaji Gavane, Parli, Dist.Beed** ---------------------------- ३९

११ **Rethinking Anna Bhau Sathe: A Social Reformist and Voice of Dalit Anguish**
**- Dr. Tabassum Inamdar, Georai, Dist.Beed** ---------------------------- ४२

१२ **Disparate Subaltern Voices-A Study of Annabhau Sathe's and Mahasweta Devi's works - Dr.Kirti Nakhare, Mumbai** ---------------------------- ४७

१३ **Anna Bhau Sathe's Scientific Approach**
**- Dr.Kishor Ingole, Hingoli** ---------------------------- ५१

१४ **Feminine Sensibilities in the Select Short Stories of Anna Bhau Sathe**
**- Dr.P.A.Waghmare, Muktainagar, Dist.Jalgaon** ---------------------------- ५६

१५ **Psycho - Social Impact of Anna Bhau Sathe's life and works**
**- Dr.Pragati Barthwal, Dehradun** ---------------------------- ५९

१६ **Anna Bhau Sathe's Fakira: A Voice of Marginalized Society**
**- Dr.Shivkumar Rautrao, Latur** ---------------------------- ६३

१७ **Economic Marginality and Gendered Subalternity in Anna Bhau Sathe's Chitra**
**-Dr.Dhananjay Sathe, Pandharpur, Dist.Solapur** ---------------------------- ६७

१८ **Anna Bhau Sathe: A Novelist of Undertroden**
**- Dr.Shailaja Kuchekar, Kada** ---------------------------- ७१

ISSN No. 2394-5990

१९ **Anna Bhau Sathe: The Greatest Novelist**
**- Dr. Shaili Gupta, Dehradun, Uttarkhand** -------------------------- ७३

२० **The Perception of Lokshahir Anna Bhau Sathe's Literature : Analytical Study**
**- Dr.Vijay Tunte, Amalner, Dist.Jalgaon** ---------------------------- ७७

२१. **Reflection of Protest of subaltern community in Annabhau Sathe's Novels "Fakira and Warnecha Wagh" - Dr.Dhananjay Waghdare, Pandharpur, Dist.Solapur** --- ८१

♦♦♦

 ISSN No. 2394-5990

# अण्णाभाऊ साठे : मानवतावादी साहित्यिक

**– डॉ. सहदेव विलासराव रसाळ**
**सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद ४१३५०१.**
**मो. नं. ९९७०६७६०५४. ई-मेल** devrasal@gmail.com

**सारांश :**

अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्य विश्वातील मानवतावादी प्रवृत्तीचे साहित्यिक होते. त्यांच्या साहित्य निर्मितीच्या केंद्रस्थानी माणूस असलेला दिसतो. या माणसाला मानवतेच्या पातळीवर स्वाभिमानाचे जिणे बहाल करून देण्यासाठी अण्णाभाऊंची लेखणी तळपताना दिसते. मानवतावादी भूमिकतून लेखन करणारे अण्णाभाऊ विज्ञानवाद, प्रबोधन आणि पुरोगामित्वाच्या अंगानेही लेखन करतात. या त्यांच्या लेखनपर भूमिका निश्चितपणाने मानवतावादाशी पूरकच आहेत. हे आपणणास निश्चितपणाने स्वीकारावेच लागेल. त्यांच्या कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, लोकनाट्ये, पोवाडे आणि अन्य वाङ्मय प्रकारातून जो मानवतावाद साकार झाला आहे याचा वेध येथे घेतला जाणार आहे. त्यांच्या एकूणच साहित्यकृतीतून साकार झालेले नायक-नायिका भाकरीसाठी संघर्ष करणारे लढवय्ये व्यक्तिमत्व आहेत. या व्यक्तिमत्वाला मानवतेच्या अंगाने खंबीरपणाने उभे करण्याची यशस्वी भूमिका अण्णाभाऊंनी पार पाडली आहे. याची अगदी सूक्ष्मपणाने उकल येथे केली जाणार आहे. अण्णाभाऊंच्या एकूणच साहित्याच्या केंद्रस्थानी असलेला मानवतावादी विचार सांगितल्यानंतर समारोप आणि निष्कर्ष नोंदविले जाणार आहेत. जे एकूणच विवेचनाला पूरक असणार आहेत. या स्वरूपाची एकूणच संशोधनात्मक मांडणी असणार आहे.

**बीजशब्द** : पुरोगामित्व, समता, सत्यशोधक, स्वाभिमान, वर्गसंघर्ष, वंचित, जातीअंत, प्रस्थापित इत्यादी.

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यविश्वात अण्णाभाऊ साठे यांनी एक वेगळी भूमिका घेऊन लेखन केले. त्यांच्या लेखनाच्या मुळाशी बहुआयामी दृष्टिकोन दडलेले आहेत. विशेषत: मानवतावादी दृष्टिकोन हा त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी असलेला दिसतो. माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे. हा महत्त्वपूर्ण विचार त्यांनी आपल्या एकूणच साहित्याच्या माध्यमातून मांडला. आपल्या समाजव्यवस्थेत उपेक्षा वाट्याला आलेल्या माणसांना सन्मानाचे जिणे बहाल करून देण्यासाठी अण्णाभाऊंची लेखणी आग्रही राहिलेली आहे. त्यांच्या समग्र साहित्यकृतींवर प्रकाश टाकल्यानंतर प्रामुख्याने असे निदर्शनास येते की, तळागाळातील माणसांना सन्मानाने जगता आले पाहिजे. हाच मानवतावादी दृष्टिकोन त्यांच्या साहित्यातून ओतप्रोत भरलेला दिसतो. याचा वेध या निमित्ताने घेण्यात येणार आहे. आपल्या व्यवस्थेने नाकारलेल्या सर्वच स्तरातील माणसाांन अण्णाभाऊंनी साहित्याच्या माध्यमातून नायकत्व बहाल करून देऊन मानवतावादी विचारांची पायाभरणी केली आहे. याचा प्रत्यय त्यांच्या एकूणच कलाकृतीवरून येतो.

अण्णाभाऊंच्या एकूणच कादंबरी वाङ्मयाचा सूक्ष्म पातळीवर आढावा घेतल्यानंतर हेच निदर्शनास येते की, त्यांच्या कादंबरी वाङ्मयाने एका वेगळ्या मानवतावादी मांडणी केली आहे. या व्यवस्थेने ज्या माणसांची साहित्याच्या दृष्टिकोनातून अभावानेच नोंद घेतली. अशा माणसांना अण्णाभाऊंनी आपल्या कादंबरी वाङ्मयातून नायकत्व बहाल केले. हा खरा मानवतावादी साहित्यिक त्यांच्या रुपाने दिसून येतो. या समाजव्यवस्थेत वावरताना प्रत्येक आघाडचांवर अमानवियता वाट्याला आलेल्या अण्णाभाऊंनी मात्र सर्वांनाच मानवतेच्या दृष्टीने पाहिले. त्यांच्या कथासंग्रह, लोकनाट्ये, पोवाडे, नाटक, प्रवासवर्णन आणि अन्य वाङ्मय प्रकारातून केलेल्या लेखनातूनही मानवतावादी दृष्टिकोन अवतरलेला आहे. यावरून अण्णाभाऊंचे एकूणच लेखन अधिकांशी मानवतावादी दृष्टीने साकार झालेले दिसते.

**उद्दिष्ट्ये :**

१. अण्णाभाऊ साठे यांच्या मानवतावादी दृष्टिकोनाची मिमांसा करणे.
२. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यिक योगदान निश्चित करणे.
३. अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनातील चौफेर भूमिका अभ्यासणे.
४. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावादाची वेगळ्या अंगाने ओळख करून देणे.

**संशोधन पद्धती :**

संशोधन हे अभ्यासपूर्ण, आकलनात्मक, चिंतनात्मक,

परीक्षणात्मक, तटस्थ, सापेक्षी, वैशिष्ट्यपूर्ण तर्क आणि अनुभवात्मक होण्यासाठी संशोधनात्मक वृत्तीचे अधिष्ठान महत्त्वाचे असते. शोध निबंधाचा विषय आणि त्याचा उद्देश लक्षात घेता प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

**अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावादी विचार:**

समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी सातत्याने आग्रही असलेले साहित्यिक अण्णाभाऊ साठे होत. त्यांच्या लेखणीतून सातत्याने मानवतावादी विचार पाझरताना दिसतो. मुळात अण्णाभाऊंचा जन्म उपेक्षित वर्गात झाल्यामुळे त्यांना सभोवताली असलेल्या अमानवी प्रवृत्तीचे दर्शन घडत गेले. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी आपल्या साहित्य लेखनाच्या माध्यमातून सातत्याने मानवतेचा पुरस्कार केला. त्यांनी हाताळलेल्या वाङ्मयप्रकारातून या व्यवस्थेतील सर्वच स्तरातील उपेक्षित माणसांचे जगणे त्यांनी यथार्थपणे साकार केले. तळागाळातील माणसे, कामगार, महिला आणि गावगाड्यातील एकूणच माणसे एका वेगळ्या चाकोरीतून अण्णाभाऊंनी रेखाटली आहे. या एकूणच साहित्य निर्मितीच्या मागे त्यांचा मानवतावादी विचार दडलेला आहे. याची साक्ष त्यांच्या एकूणच साहित्यकृतीच्या अवलोकनावरून भेटते. या अनुषंगाने साकार झालेली स्वत: अण्णभाऊंची रचना खूप बोलकी वाटून जाते ती अशी....

''जग बदल घून घाव। सांगून गेले मला भीमराव।।
गुलामगिरीच्या या चिखलात। रुतून बसला का ऐरावत।।
अंग झाडूनी निघ बाहेरी। घे बिनीवरती घाव।।''

ही जग बदलण्याची प्रेरणा खऱ्या अर्थाने मानवतावादीच आहे. सामान्य माणसाच्या आयुष्यात प्रगतीचा प्रकाश आला पाहिजे. ही परिवर्तनाची सक्षम भूमिका या रचनेच्या माध्यमातून अधोरेखित होते.

अण्णाभाऊ साठे हे प्रयोगशिल व प्रतिभासंपन्न साहित्यिक होते. याची साक्ष लेखनातील असंख्य प्रसंगावरून भेटते. त्यांनी साहित्यातील जवळपास सर्वच वाङ्मयप्रकार हाताळले. त्यांचे कादंबरीलेखन तर समाजातील सर्वसामान्य माणसांना एक वेगळा चेहरा देणारे आहे. त्यांच्या आयुष्यातील वेगवेगळ्या अंगांना मानवतेच्या दृष्टिकोनातून स्पर्श करणारे आहे. त्यांच्या या साक्षेपी लेखनाबद्दल डॉ.राजशेखर शिंदे विवेचन करतात. 'अण्णाभाऊ साठ्यांनी 'चित्रा' (१९५१), 'फकिरा', 'वैजयंता', 'माकडीचा माळ', 'आवडी', 'वैर', 'रानगंगा', 'पाझर', 'मास्तर', 'वारणेचा वाघ', चंदन', 'अलगुज', 'केवड्याचं कणीस', 'चिखलातील कमळ' इ. विपुल कादंबरीलेखन केलं. लोकमानसातील इतिहासाला कलात्मक सौष्ठव दिलं. फकिरा, वारणेचा वाघ, मास्तर या नायकांकडे पाहिले तर ते लोकमानसांमधीलच आहे. पराक्रमी पुरुष लोकमाणसाच्या हृदयसिंहासनात बसलेले असतात.''[१] यावरून अण्णाभाऊंच्या लेखनातील मानवता निदर्शनास येते. त्यांचे कादंबरीलेखन आणि कादंबरीच्या माध्यमातून साकार झालेले नायक हे त्यांच्यातील मानवतेचे दर्शन घडवतात. हे अगदी सहजतेने दिसून येते. अण्णाभाऊंच्या कादंबरी विश्वातील मानवतेच्या दृष्टिकोनाबद्दल विवेचन करताना डॉ.प्रमोद म्हणतात, ''अण्णाभाऊ ज्या समाजात जन्मले ते जीवन, तेथक्षल व्यथा-वेदना ह्या जिवघेण्या होत्या. ते सर्व अनुभव त्यांच्या पाठीशी होते. तेथील जीवन जाणिवांशी ते एकरून झालेले होते. गावकुसाबाहेरील सर्व दुःखमय जीवन ते जगले होते. हे सर्व त्यांना समकालीन साहित्यात दिसत नव्हते. ते काही त्यांच्या वाचनात येत होते. ते सर्व गुळगुळीत अनुभव होते, मनाला रिझवणारे होते. परंतु आपण अनुभवलेले आयुष्य या साहित्यापेक्षा फार वेगळे आहे. या जाणिवेतून अण्णाभाऊ समाजातील तळागाळाच्या लोकांचा वेदनामय जीवनपट आपल्या कथात्म वाङ्मयातून रेखाटू लागले. त्यात दलित-पददलित, हीन-दीन, कामगार, भणंग-भिकारी, दरोडेखोर, गावगाड्यातील अठरा पगड जातीतील लोकांचे अनुभवविश्व त्यांनी चित्रित करून त्यांना साहित्याच्या दालनात बसविले.''[२] ही एक वेगळी मानवतानिष्ठ दृष्टी येथे समोर येते. उपेक्षित वर्गातील माणसांना साहित्याच्या माध्यमातून बोलते करणारे प्रतिभासंपन्न साहित्यिकांच्या पंक्तितील अण्णाभाऊ हे एक सामर्थ्यवान नाव ठरते.

अण्णाभाऊंनी त्यांच्या एकूणच वाङ्मयाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या स्तरातील माणसांचे चित्रण केले. त्यामध्ये प्रामुख्याने दीन, दुबळे, शोषित, पीडित, गावकुसातील, गावकुसाबाहेरील दलित, पददलित, उपेक्षित व भटके-विमुक्त यांचा समावेश करता येईल. तद्यांच्या समग्र साहित्यातून सत्यासाठी, न्यायासाठी, स्वाभिमानासाठी आणि 'स्व' अस्तित्वासाठी, हक्कासाठी संघर्षाच्या पावित्र्यात असलेले दिसतात. त्यांचा हा लढाच मुळात मानवतेच्या हक्कांसाठी आहे. अण्णाभाऊंच्या या मानवतावादी दृष्टिकोनाबद्दल डॉ.म.सु.पगारे विवेचन करतात, '''फकिरा' ही अण्णाभाऊ साठेंनी लिहिलेली कादंबरी आहे. फकिरा दरोडेखोर खेड्यातील लोकांसाठी कसा उपयोगी पडतो, त्याचे वर्णन येते. धार्मिक विधी, परंपरा, दरोडा, न्याय

 ISSN No. 2394-5990

असे अनेक संदर्भ येतात. आपसातील संघर्ष, प्रेमळ वागणूकदेखील दिसते. दलित शोषित जीवनाचे चित्रण आहे. या कादंबरीचा नायक लोकविलक्षण आहे. सत्यासाठी, स्वत्वासाठी आणि न्यायासाठी लढणारा नायक दिसतो. अण्णभाऊंच्या 'वैजयंता', 'पाझर', 'मास्तर', 'वारणेचा वाघ', 'चिखलातील कमळ' या कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनचित्रण दिसते. 'माकडीचा माळ' या कादंबरीत अण्णाभाऊंनी डवरी, गोसावी, माकडवाले या भटक्या जमातींच्या जीवनाची पार्श्वभूमी योजलेली आहे. यंकू माकडवाल्याची मुलगी दुर्गा आणि सख्या माकडवाल्याचा मुलगा यम्या यांच्या प्रेमाची ही कथा आहे. पालावरचे अस्थिर जीवन भीषण दारिद्र्य, ग्रामजीवनाचे सखोल आकलन यातून जाणवते.''[३] ही अण्णाभाऊंची आपल्या पात्रांविषयीची मानवताधिष्ठित भूमिका समोर येते. या माणसांना स्वाभिमानाचे जगणे जगता आले पाहिजे. ही त्यांची धारणाच मुळात त्यांच्यातील परिवर्तनवादी साहित्याचे दर्शन घडवते. याबद्दल प्रा.डॉ.शिवाजीराव जवळगेकर यांचे विवेचन अगदी ज्वलंत वाटते. ते असे. ''अण्णाभाऊंना या देशशतील माणसांच्या मानसिक प्रवृत्तीची नस सापडली होती. म्हणूनच समग्र मानवजातीचे प्रतिनिधिक स्वरुपात दु:ख वा दु:खानुभव मांडले आहेत. परंपरावादी समाजव्यवस्थेच्या विरोधी क्रातीकारी आवाज प्रभावशाली लोकाशक्तीच्या, श्रमिकांच्या बळावर उभा केला. समाजातील दुबळे आणि उपेक्षित माणसाला जागृत करून सर्व पातळीवरील विषमतेविरुद्धच्या लढाईत सहभागी होण्यास अण्णाभाऊंनी प्रेरणात्मक शक्ती दिली. संघर्ष वा लढा कशासाठी तर ज्ञान, सत्ता, संपत्ती आणि संधीपासून उपेक्षित राहिलेल्या माणसांचे जीवन सुखी व्हावे म्हणून साहित्याद्वारा संघर्ष केला. मानवाला सर्वच पातळीवरच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी लढा दिला.''[४] यावरून अण्णाभाऊंची मानवतावादी दृष्टी स्पष्ट होते. उपेक्षितांच्या जगण्याबद्दल कमालीची आस्था त्यांनी आयुष्यभर बाळगली. त्यांना आपल्या साहित्याच्या माध्यमातून न्याय देण्याचे काम अण्णाभाऊंनी केले.

मानवतेच्या बाजूने उभे असलेले अण्णाभाऊ आयुष्यभर माणसाच्या स्वाभिमानासाठी लेखन करीत राहिले. कधीही जाती-धर्मापेक्षा माणूस मोठा असतो. हा परिवर्तनवादी विचार त्यांच्या साहित्यातून साकार होतो. पुरुषांच्या बरोबरीनेच त्यांनी स्त्रियांचेही जीवन साहित्याच्या माध्यमातून अजरामर केले. त्यांच्या साहित्यकृतीतून येणाऱ्या स्त्रिया हा स्वाभिमानी साहित्याच्या अवलोकनावरून स्पष्ट होते. त्यांच्या साहित्यातून समाज आणि सामाजिक वास्तवाचे भान कधीही सुटले नाही. अन्यायाच्या विरोधात खंबीरपणाने उभे राहणारे नायक आणि नायिका हेच खऱ्या अर्थाने मानवतावादाच्या चाकोरीतून वावरतात. समाजाच्या शेवटच्या स्तरातील या माणसांच्या वाट्याला आलेली दाहकता ही जीवघेणी आहे. हे अण्णा भाऊंनी जवळून अनूभवले आणि पाहिले होते. म्हणूनच त्यांच्या वाङ्मयातून ही माणसे अधिक गहिऱ्या स्वरूपात रेखाटली गेली आहेत. अशाच वास्तवावर डॉ.राजेंद्र कुंभार यांच्या संपादकीय मनोगतातून प्रकाश पडतो. ''साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत चिरागनगरसारख्या झोपडपट्टीत राहून विपुल आणि दर्जेदार लेखन केलेले आहे. भांडवलशाही व जातीय विषमतेने ग्रासलेल्या भारतीय समाजात अण्णाभाऊ साठे यांच्या वाङ्मयीन कार्याचे मूल्यमापन त्यांच्या हयातीत किंवा त्यानंतरही झाले नाही. अण्णाभाऊंचे साहित्य कवडीमोल भावाने विकत घेऊन त्यावर अनेक प्रकाशक लक्षाधीश झाले, पण अण्णाभाऊंच्या वाट्याला मात्र उपेक्षिताचे, दारिद्र्याचे व हलाखीचे जीवन आले. अण्णाभाऊंच्या साहित्याची उंची आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. संपूर्ण आयुष्य वेदनामयरित्या व्यतीत करणाऱ्या अण्णाभाऊंनी अनुभवलेले जग हे वेगळेच होते. या जगाला मानवतेच्या पातळीवरून त्यांनी यशस्वीपणे मांडले आहे. या मुक्या माणसांना त्यांनी साहित्यातून बोलके केले आहे. अशा वेगवेगळ्या जगाची वेदना अण्णाभाऊंच्या साहित्यातून मुक्रर होते.

अण्णाभाऊंचे साहित्य हे न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधूता या मूल्यांचा स्वीकार करून जन्माला आलेले साहित्य असल्यामुळेच त्यांच्या साहित्यात आपोआपच मानवतेचे मूल्य साकार झाले आहे.अण्णाभाऊंनी अनुभवलेले पारतंत्र्य, गरीबी आणि दारिद्र्य हे त्यांना एका वेगळ्या वेदनादायी विश्वाची आठवण करून देणारे होते. ब्रिटिशांनी लादलेली सत्ता आणि समाजातील विषमता ही त्यांना खूप मोठ्या अन्यायाची प्रतिके वाटत होती. याबद्दल त्यांनी आपल्या साहित्य लेखनातून आवाज उठवला होता. हा आवाजच त्यांच्यातील क्रांतीकारी व्यक्तिमत्वाचा परिचय करून देतो. तळागाळातील माणसांबद्दल कमालीची आपुलकी बाळगणारे अण्णाभाऊ याच माणसांना आपल्या साहित्याच्या केंद्रस्थानी ठेवतात. हीच माणसे त्यांना या व्यवस्थेतील खरे नायक वाटतात. ही माणसे मानवाच्या प्रतिष्ठेसाठी लढा देतात. या

माणसांचा वावर अण्णाभाऊंच्या साहित्यात अधिक दिसतो. याबद्दल डॉ.गिरिश मोरे विवेचन करतात, ''अण्णाभाऊंच्या सर्वच लेखनातील विचारस्वातंत्र्य हे मूल्यांची जोपासना करताना दिसून येते. वारणेच्या खोऱ्यात मधील हिंदूराव व मंगलाच्या स्वातंत्र्यासाठी समर्पित होतात. 'मास्तर' मधील मास्तर ब्रिटिशांविरुद्ध झगडतो. 'फकिरा' या नायकाला तर समाजव्यवस्थेने निर्माण केलेले कोणतेही बंधन नको वाटतात. ब्रिटीशाने लादलेली हजेरी त्याला नको वाटते. शेवटपर्यंत तो ब्रिटिशांबरोबर संघर्ष करतो. मानवी स्वातंत्र्य आणि मानवाची प्रतिष्ठा जोपासणारी त्याची वृत्ती मराठी साहित्यात अपवादाने पहायला मिळत होती.''[६] ही अण्णाभाऊंची मानवतेची भूमिका येथे अभिव्यक्त होते. आपल्या सभोवतालाला नेमकेपणाने आपल्या लेखणीच्या सामर्थ्यातून चित्रित करण्याची वेगळी प्रतिभा घेऊन अण्णाभाऊ जन्माला आले होते. या उपेक्षित माणसांचे एक भणंग जग होते. या जगाचे अण्णाभाऊही साक्षीदार होते. त्यामुळे या जगातील माणसांच्या दुःखाची झळ स्वत: त्यांनी भोगलेली होती. म्हणूनच अण्णाभाऊंचे साहित्य माणसांची कदर करते. त्या माणसाच्या सन्मानासाठी आग्रही असते.

अण्णाभाऊंचे समग्र साहित्य उपेक्षा वाट्याला आपलेल्या माणसांना सन्मान प्राप्त करून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. त्यांनी आपल्या अनुभवाच्या सामर्थ्यावर मराठी साहित्यविश्वाचा परिघ समृद्ध करण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्यामुळे त्यांचा साहित्य परिघ मराठी आणि भारतीय साहित्यविश्वापर्यंत मर्यादीत न राहता त्याला जागतिक अधिष्ठान प्राप्त झाले आहे. नवा मानवतावादी विचार ज्या लेखकांनी आपल्या साहित्यातून मांडला त्यात जास्तीचे श्रेय अण्णाभाऊंना देता येईल. अशी संपन्न रचना करणारे मानवतावादी साहित्यिक ते होते. त्यांच्या साहित्य रचनेच्या अनुषंगाने प्रस्तावनापर विवेचन विनोद तावडे यांनी केले आहे. ते असे, ''अण्णाभाऊंनी सामान्य श्रमिक, मागासवर्गीय व सामान्य माणसाला वाङ्मयाच्या केंद्रस्थानी आणले. ज्या समाजाने दलित दरिद्री व बहुजन मानले त्या श्रमिकांना जीवनमूल्य असतात व ती जीवनमूल्य जपण्यासाठी ते प्राणपणाने लढा देतात. श्रमिकांचा हक्क जपणारा नायक आणि अब्रू जपण्यासाठी प्राणपणाला लावणारे नायक व नायिका अण्णाभाऊंनी रंगविले.''[७] अशा वेगवेगळ्या दृष्टीने अण्णाभाऊंची ामनवतेवर असलेली निष्ठा प्रकट होते. त्यांच्या साहित्यातून समाजातील सर्वच स्तरातील उपेक्षा वाट्याला आलेली माणसे रेखाटण्यात आली आहेत. समाजाच्या तळागाळातील, दलित-पददलित आणि उपेक्षितांना समाजात 'माणूस' म्हणून जगता आले पाहिजे. ही आत्मसन्मानाची जाणीव या माणसांच्या मनात पेरली जावी हा निखळ हेतू डोळ्यांसमोर ठेवून ही माणसे अण्णाभाऊंनी साहित्याच्या माध्यमातून चित्रित केली आहे. यामुळे हे अपरिचित जगणे मराठी साहित्यविश्वात अवतरले. या उपेक्षा वाट्याला आलेल्या दुर्लक्षित माणसाचे जगणे किती यातनांनी भरलेले आहे हे अण्णाभाऊंच्या साहित्य लेखनामुळे समजू शकते. या सर्व साहित्यलेखनामागील अण्णाभाऊंची मानवतावादी दृष्टी अधिक प्रगल्भ स्वरुपाची वाटते.

**समारोप आणि निष्कर्ष :**

मराठी साहित्यविश्वाला एक वेगळा चेहरा प्राप्त करून देणारे लोकलेखक तथा साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या मानवतावादी भूमिकेचा वेध येथे घेण्यात आला आहे. त्यांचा एकूणच समाजाकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा सकारात्मक होता. त्याबरोबर अन्यायाच्या विरोधात पेटून उठण्याची खंबीर दृष्टीही त्यांच्या लेखनातून अवतरलेली आहे. अपेक्षा वाट्याला आलेल्या माणसांकडे मानवतावादी दृष्टीने पाहिले गेले पाहिजे. ही भूमिका घेऊन अण्णाभाऊंचे साहित्य आकारास आले आहे. याचा साक्षेपी वेध या निमित्ताने अण्णाभाऊंच्या मानवतावादी साहित्याची मांडणी करण्यात आली. यातून हाती आलेले निष्कर्ष असे आहेत.

१) अण्णाभाऊ साठे यांच्या एकूणच साहित्यात मानवतावाद ओतप्रोत भरलेला आहे.

२) अण्णाभाऊंनी आपल्या साहित्य लेखनाच्या माध्यमातून दलित, भटके, कामगार, शोषित, झोपडपट्टीतील माणसे, गावातील घरंदाज स्त्रिया व मागास स्त्रिया, गावातील माणसे आणि शहरांचे वास्तव मांडले.

३) साहित्यापासून वंचित राहिलेल्या माणसांसोबतच अण्णाभाऊंनी न्यायाच्या भूमिकेत उभ्या असणाऱ्या सर्व स्तरातील माणसांना साहित्याच्या माध्यमातून नायकत्व बहाल केले.

४) अण्णाभाऊंनीी भाकरीसाठी लढणारी खंबीर माणसे साहित्याच्या माध्यमातून उभी केली.

५) सामाजिक आणि वैचारिक बांधिलकी स्वीकारून अण्णाभाऊंनी अक्षर वाङ्मयाची निर्मिती केली.

६) अण्णाभाऊंनी दलित, उपेक्षित, वंचित आणि व्यवस्थेच्या शेवटच्या स्तरातील माणसांच्या उत्थानासाठी आपली लेखणी झिजवली.

७) देशाचे स्वातंत्र्य, स्त्रियांचे स्वातंत्र्य, पुरुषांचा स्वाभिमान,

 ISSN No. 2394-5990

सामाजिक समता आणि मानवता या उदात्त हेतूने अण्णाभाऊंनी साहित्यनिर्मिती केली.

८) आपल्या वास्तव जीवनानुभवाला साहित्याच्या माध्यमातून कल्पनेच्या रूपाने अण्णाभाऊंनी मुखर केले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) रामचंद्र काळुंखे (संपा.) ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास (डॉ.राजशेखर शिंदे यांचा लेख), कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १५ जुलै २०१६, पृ.क्र.२१८.

२) डॉ.प्रमोद गारोडे – अण्णाभाऊंचे कादंबरीविश्व (समीक्षा ग्रंथ), कमल प्रकाशन ठाणे, प्रथमावृत्ती सप्टे.२००६, पृ.क्र.१२८.

३) डॉ.म.सु.पगारे – साहित्य लोक, ग्रामीण आणि दलित खंड–२, दिलीपराज प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती ७ जाने. २०१२, पृ.क्र.१२

४) प्रा.नागोराव कुंभार (संपा.) शाहीर अण्णाभाऊ साठे (प्रा.डॉ.शिवाजी जवळगेकर यांचा लेख) प्रबोधन प्रकाशन, लातूर. प्रथमावृत्ती : ९९३, पृ.क्र.२८.

५) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाङ्मय (कादंबरी खंड–१) (डॉ.राजेंद्र कुंभार यांचे संपादकीय मनोगर), साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, पृ.क्र.१३. संपादकीय)

६) डॉ.अमर कांबळे व शोभा चाळके (संपा.) समग्र अण्णाभाऊ साठे (डॉ.गिरीश मोरे यांचा लेख). निर्मिती संवाद प्रा. लि. कोल्हापूर, प्रथमावृत्ती १ ऑगस्ट २०१७, पृ.क्र.९३.

७) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाङ्मय (कादंबरी खंड२) प्रस्तावना – विनोद तावडे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, पृ.क्र.९ (प्रस्तावना).


●●●